# सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदाच्या जाहिरातीबाबत जाहिर सुचना

सिडको महामंडळाने दि. 18.01.2024 रोजी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. तसेच, दि.15.03.2024 रोजी प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकाद्वारे सदर जाहिरातीमध्ये प्रसिद्ध केलेल्या रिक्त पदांच्या आरक्षणात बदल करण्यात आल्याचे कळविण्यात आले होते.

अन्वये, दि. 10.07.2024 रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर सुचनेद्वारे इतर मागास वर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व खुल्या/ अराखीव प्रवर्गातील (OPEN) उमेदवारांना त्यांचा प्रवर्ग बदलून एसईबीसी (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर करण्याकरीता लिंक उपलब्ध करुन देण्यात आली होती.

तसेच, नव्याने अर्ज सादर करु इच्छिणाऱ्या उमेदवारांकरीता व यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना दुसऱ्या प्रवर्गातून अर्ज सादर करावयाचा असल्यास नजिकच्या काळात ऑनलाईन लिंक सिडको संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले होते.

1. अन्वये, यापूर्वी अर्ज सादर केलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या सादर केलेल्या अर्जातील प्रवर्ग बदलावयाचा असल्यास अशा उमेदवारांना नव्याने अर्ज सादर करावा लागेल. उदाहरणार्थ यापूर्वी इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या ज्या उमेदवारांना त्यांचा प्रवर्ग बदलून एसईबीसी (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर करावयाचा असल्यास अशा उमेदवारांना https://ibpsonline.ibps.in/cidcoapr23/ सदर लिंकद्वारे दि. 01.09.2024 ते दि. 15.09.2024 या कालावधीत अर्ज सादर करता येणार आहे. सदर उमेदवारांनी खालील बाबींची नोंद घ्यावी:-
   i. नवीन अर्ज सादर करतेवेळी, नव्याने परीक्षा शुल्क भरावे लागेल व याआधी भरणा करण्यात आलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा मिळणार नाही.
   ii. एकापेक्षा अधिक अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या अर्जांपैकी त्यांनी परीक्षाशुल्क भरुन सादर केलेला शेवटचा अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.
2. सिडको महामंडळातर्फे सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदासाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून नव्याने अर्ज सादर करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना https://ibpsonline.ibps.in/cidcoapr23/ सदर लिंकद्वारे दि. 01.09.2024 ते दि. 15.09.2024 या कालावधीत अर्ज सादर करता येणार आहे. नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी दि. 18.01.2024 रोजी प्रसिद्ध केलेली जाहिरात तसेच सहा. अभियंता (स्थापत्य) या पदासाठी www.cidco.maharashtra.gov.in या सिडको संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या जाहिरसुचना तसेच शुद्धिपत्रकाचे अवलोकन करावे.

व्यवस्थापक (कार्मिक)

दि.30.08.2024